## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र राज्याच्या किनारपट्टी लगतच्या समुद्रात मासेमारी गलबतांद्वारे होणाऱ्या मासेमारीचे नियमन करण्यासाठी व त्याच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्यासाठी महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ (१९८१ चा महा. ५४) अधिनियमित करण्यात आला आहे. राज्य शासन, मासेमारी करणाऱ्या व्यक्तींच्या वेगवेगळ्या घटकांच्या, विशेषकरून पारंपरिक मच्छिमारांच्या हिताचे संरक्षण करण्याची गरज आणि शास्त्रीय तत्त्वावर मासळीचे संवर्धन करण्याची व मासेमारीचे विनियमन करण्याची आणि समुद्रातील कायदा व सुव्यवस्था राखण्याची गरज विचारात घेतल्यानंतर, मासेमारीचे विनियमन करण्यासाठी उक्त अधिनियमान्वये वेळोवेळी, आदेश काढते.

२. उक्त अधिनियम अधिनियमित केल्यापासून बराचसा काळ लोटलेला आहे. या कालावधीत, मत्स्यव्यवसाय व मासेमारीच्या पद्धती बदललेल्या आहेत. अभिनिर्णय अधिकारी म्हणून, तहसीलदारापुढे प्रलंबित असणाऱ्या प्रकरणांमध्ये वाढ झाल्यामुळे, तहसीलदाराऐवजी मत्स्यव्यवसाय विभागाच्या अधिकाऱ्यास अभिनिर्णय अधिकारी म्हणून घोषित करणे इष्ट वाटले होते. असे निदर्शनास आले होते की, जिल्हा सल्लागार समित्यांकडून वेळेत सल्ला मिळत नसल्यामुळे शासनाद्वारे मासेमारीचे नियमन करण्याच्या निर्णय प्रक्रियेस विलंब होत होता. या अधिनियमामध्ये तरतूद केलेल्या शास्ती, त्याच्या अधिनियमितीपासून बदलण्यात आलेल्या नव्हत्या. वरील सर्व बाबी पाहता, उक्त अधिनियमाच्या विवक्षित तरतुदींमध्ये सुधारणा करणे, शासनाला इष्ट वाटले.

३. सुधारणांची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :—

(एक) तहसीलदाराऐवजी, अभिनिर्णय अधिकारी म्हणून अधिकारिता असणारा सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यास घोषित करणे;

(दोन) "मासे", "मासेमारी सामग्री", "मत्स्यव्यवसाय", "कप्तान", "यांत्रिक गलबत", "यंत्रचालित गलबत", "बिगर-यंत्रचालित गलबत", "प्रचालक (तांडेल)", "मालक", आणि "शाश्वत मासेमारी" या नवीन संज्ञांची व्याख्या करणे ;

(तीन) प्रकरण दोन अन्वये अंमलबजावणी करावयाच्या विनियमांची राज्य शासनास शिफारस करण्याकरिता, आणि जिल्हा समित्यांचे समन्वयन, संनियंत्रण करण्यासाठी आणि त्यांना सल्ला किंवा निदेश देण्यासाठी राज्य सल्लागार व संनियंत्रण समितीची तरतूद करणे ;

(चार) विविध मासेमारी गलबतांच्या आणि मासेमारी प्रकारांच्या बाबतीत, खलाशांची व मासेमारी गलबतांची संख्या विनियमित करणे ;

(पाच) मच्छीमारांची सुरक्षा आणि कायदा व सुव्यवस्था यांसाठी सागरी पोलिसांनी व मत्स्यव्यवसाय विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या कोणत्याही सूचनांचे किंवा निदेशांचे अनुपालन करण्यास मच्छीमार व त्यांच्या सहकारी संस्था बांधील असतील अशी तरतूद करणे ;

(सहा) यंत्रचालित किंवा यांत्रिक मासेमारी गलबताच्या कप्तानास किंवा प्रचालकास (तांडेल) लायसन देण्यासाठी तरतूद करणे ;

(सात) गलबतावर बसविलेली उपसाधने व मासेमारी सामग्री जप्त करण्यासाठी तरतूद करणे ;

(आठ) मासेमारीत वापरलेल्या विविध प्रकारच्या गलबतांच्या बाबतीत, अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचे किंवा कोणत्याही आदेशाचे किंवा नियमाचे अथवा लायसनाच्या कोणत्याही शर्तींचे उल्लंघन केल्याबद्दल आणि विविध प्रकारच्या विनियमांच्या उल्लंघनाबद्दल वाढीव शास्तीची तरतूद करणे ;

(नऊ) लायसन देणाऱ्या अधिकाऱ्याच्या किंवा नोंदणी अधिकाऱ्याच्या तसेच अभिनिर्णय अधिकाऱ्याच्या आदेशांविरुद्ध प्रथम अपील प्राधिकारी म्हणून मत्स्यव्यवसाय आयुक्तासमोर आणि द्वितीय अपील प्राधिकारी म्हणून शासनासमोर अपील दाखल करण्यासाठी तरतूद करणे ;

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेत :—

**खंड १ (२).—**या खंडान्वये, कलम ६ चे पोट-कलम (२) व कलम ७ च्या तरतुदी, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमून दईल अशा दिनांकास अंमलात आणण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे, घेण्यात आला आहे.

**खंड ४.—**महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ (१९८१ चा महा. ५४) याच्या कलम ४ ची सुधारणा करण्याचा हेतू असलेल्या या खंडान्वये, वेगवेगळी मासेमारी गलबते आणि मासेमारीचे प्रकार याबाबतीत खलाशांची संख्या आणि मासेमारी सामग्री नियमित करण्याचा, निबंधित करण्याचा किंवा त्यास प्रतिबंध करण्याचा आदेश काढण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे, घेण्यात आला आहे.

**खंड ६.—**उक्त अधिनियमाच्या कलम ६ मध्ये सुधारणा करण्याचा हेतू असलेल्या या खंडान्वये, उक्त अधिनियमान्वये लायसन प्राप्त करण्यासाठी मासेमारी गलबतासाठी ज्याच्याकडून सागरी सक्षमता प्रमाणपत्र घ्यावयाचे आहे तो प्राधिकारी नियमांद्वारे विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे, घेण्यात आला आहे.

**खंड ७.—**उक्त अधिनियमामध्ये नवीन कलम ८अ समाविष्ट करण्याचा हेतू असलेल्या या खंडान्वये,—

(क) मासेमारी गलबताच्या प्रचालनासाठी लायसन मिळविण्यासाठी पात्र असण्यासाठी यंत्रचलित किंवा यांत्रिक मासेमारी गलबताचे कप्तान किंवा प्रचालक (तांडेल) यांच्याकडून धारण करावयाची आवश्यक अर्हता आणि सागरी नौकानयनातील प्रशिक्षण ;

(ख) मासेमारी गलबत प्रचालनासाठी लायसनसाठी अर्जाचा नमुना, त्याचे तपशील व शुल्क, लायसनचा नमुना व त्याच्या शर्ती, नियमांद्वारे विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे, घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे उपरोल्लिखित प्रस्ताव सामान्य स्वरूपाचे आहेत.

